जा.क्र.पिसं/विप्र-७/जैकिनिप्रमा.सुचना/३८२/२०१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ५,
दिनांक - ०४/५/२०१२

प्रति,

तंत्र अधिकारी
औरंगाबाद/जळगाव/अहमदनगर/परभणी/यवतमाळ/
अमरावती/बुलढाणा/वर्धा/धुळे/नांदेड

**विषयः-** जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळांसाठी सन २०१२-१३ साठीच्या मार्गदर्शक सूचनांबाबत...

उपरोक्त विषयान्वये सन २०१२-१३ साठी जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळांसाठी मार्गदर्शक सूचना सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

**सोबत :** वरीलप्रमाणे

संचालक
विस्तार व प्रशिक्षण
कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-५

**प्रत :**

१. विभागीय कृषि सहसंचालक, पुणे/नाशिक/अमरावती/लातूर/नागपूर/औरंगाबाद यांस माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद/जळगाव/अहमदनगर/परभणी/यवतमाळ/अमरावती/बुलढाणा/वर्धा/धुळे/नांदेड यांस पुढील कार्यवाहीस्तव सादर.

D:\2012-13\Guidlines\Bio control lab 2012-13.doc

## जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळा मार्गदर्शक सुचना २०१२-१३

राज्यामध्ये विविध योजनांतर्गत मोठयाप्रमाणात विविध जैविक घटकांची मागणी आहे. त्यामुळे जैविक किटकनाशकांचा शासकिय प्रयोगशाळेतून पुरवठा करण्यास मोठा वाव असल्याने प्रयोगशाळांनी मागणीनुसार पुरवठा करण्याचे दृष्टीने गुणवत्तापुर्ण जैविक किटकनाशकांचे उत्पादन करण्यावर भर द्यावा. तसेच प्रयोगशाळेतील उपलब्ध पायाभूत सुविधा व मनुष्यबळ यांचा परिपुर्ण वापर करुन प्रयोगशाळांची उत्पादनक्षमता वाढवावी. त्यानुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत खालील प्रमाणे सुचना आहेत.

- **जैविक किटकनाशकांच्या उत्पादनाचे नियोजन**

१) प्रयोगशाळेत उत्पादित करावयाच्या जैविक किटकनाशकांचे, त्यांचे प्रकारानुसार, हंगामनिहाय व महिनानिहाय कालबध्द नियोजन करुन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

२) प्रयोगशाळानिहाय किमान ३५ मे.टन/वर्ष उद्दीष्ट साध्य करणेसाठी उपलब्ध साधन सामुग्री, मनुष्यबळ, विद्युत पुरवठा व जैविक किटकनाशकांची हंगामातील मागणी याबाबी लक्षात घेवून जैविक किटकनाशकांचे आठवडानिहाय व बॅच निहाय उत्पादनाचे सुक्ष्म नियोजन करावे.

३) खरीप व रब्बी हंगामासाठी आवश्यक जैविक किटकनाशकांची मागणी लक्षात घेवून उत्पादनासाठी लागणारा कच्चामाल व रसायने यांचे बॅक ऐंड प्लॅनिंग करावे.

४) वरीलप्रमाणे कामाचे वेळापत्रक व उत्पादनाचे नियोजन संबंधित प्रयोगशाळा प्रमुख यांनी करावे व सदरचे नियोजन जिल्हयास, विभागास व आयुक्तालयास कळवावे.

- **उत्पादन प्रक्रिया**

५) जैविक किटकनाशकांचे सीआयबी मानकांनुसार व मा. कृषि संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण) यांचे मार्गदर्शक सूचनांनुसार उत्पादन करणे, वेळोवेळी गुणवत्ता नियंत्रणासाठी नमुने काढणे व कार्यवाही करावी.

६) सीआयबी ने ठरवून दिलेल्या पॅकेजिंगमध्ये जैविक किटकनाशकांचा पुरवठा करणे तसेच प्रयोगशाळेतील विविध नोंदवहया (रजिस्टर्स) किटकनाशक कायदयातील तरतुदीनुसार विहीत प्रपत्रात अद्यावत ठेवाव्यात.

७) वेगवेगळया जैविक किटकनाशकांचा वापर करण्याची अंतिम मुदत विचारात घेऊन उत्पादनाचे व पुरवठयाचे नियोजन करण्यात यावे. हंगामास आवश्यक जैविक किटकनाशके, त्यांचा वापर करण्याची अंतिम मुदत या सर्व बाबींची सांगड घालून योग्य कालावधीमध्ये जैविक किटकनाशकांचे उत्पादन करण्याचे नियोजन करावे जेणेकरुन मागणी नुसार पुरवठा करणे शक्य होईल तसेच जैविक किटकनाशके कालबाहय होणार नाहीत.

८) प्रयोगशाळेत जैविक किटकनाशक उत्पादनास आवश्यक निर्जंतूक वातावरण व सुविधा तयार कराव्यात तसेच उत्पादन करताना विहीत सुरक्षा पदधतींचा व साधनांचा वापर करावा उदा. ऍप्रॉन, मोजे इ.

- **प्रयोगशाळा नियंत्रण व कार्यान्वयन**

९) जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळा या संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अधिपत्याखाली आहेत. त्यामुळे त्यांचे पालकत्वाची सर्वस्वी जबाबदारी त्यांची आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रयोगशाळेचा प्रत्येक महिन्याला आढावा घ्यावा व प्रयोगशाळेच्या प्रगतीबाबत माहिती घ्यावी. प्रयोगशाळांसाठी सक्षम कर्मचारी वर्ग, सुविधा, निधी उपलब्धता यासाठी मार्गदर्शन व सहाय्य करावे.

१०) प्रयोगशाळांच्या अधिगृहित केलेल्या खोल्या व कर्मचारी प्रथम प्राधान्याने प्रयोगशाळांना उपलब्ध करुन देण्यात यावेत व आवश्यकतेनुसार साधन सुविधा पुरविण्यात याव्यात. प्रयोगशाळांमध्ये उत्पादीत केलेल्या सर्व जैविक किटकनाशकांची विक्री व वापर करण्याबाबतचे नियोजन प्रयोगशाळा प्रमुख व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावे. कोणत्याही परिस्थितीत उत्पादीत साठा कालबाहय होणार नाही याची दक्षता घ्यावी. वेळप्रसंगी योजनांतर्गत वापरानंतर साठा शिल्लक राहात असल्याचा त्याचा वापर शासकीय प्रक्षेत्रावर करावा. यासाठी शासकीय प्रक्षेत्रावरील निविष्ठा खरेदीच्या रकमेतून देयके तात्काळ अदा करावीत. उत्पादीत साठा


http://mahaagri.gov.in/

शिल्लक राहून मुदतबाहय झाल्यास त्याची जबाबदारी प्रयोगशाळा प्रमुख व संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील. साठा शिल्लक ठेवून प्रक्षेत्रांवर बाहेरुन खरेदी केल्याचे निदर्शनास आल्यास अशा रकमेची वसूली प्रक्षेत्रांकडूनही करण्यात येईल.

११) जिल्हयातील जैविक किटकनाशकांची मागणी किमान एक महिना अगोदर मा. कृषि संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण) अधिनस्त समितीने लेखी स्वरुपात करावी व त्याची प्रत संबंधीत जैविक प्रयोगशाळेस देण्यात यावी. याबाबत तालुकानिहाय पुरवठयाचा कार्यक्रम संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी एक महिना अगोदर प्रयोगशाळेस कळवावा.

१२) जैविक किटकनाशकांच्या उत्पादनाबाबत व साठयाबाबत साप्ताहिक अहवाल मा. संचालक (निवगुनि) व कृषि उपसंचालक (पीकसंरक्षण) यांना देण्यात यावा. सदरचा अहवाल विहित प्रपत्रात दर गुरुवारी सादर करण्यात यावा. **सोबत अहवालाचे प्रपत्र जोडण्यात आले आहे.**

१३) जैविक प्रयोगशाळांसाठी आवश्यक कर्मचारी वर्ग विभागीय स्तरावरुन आढावा घेऊन उपलब्ध करुन देण्यात यावा. कर्मचारी उपलब्ध करुन देताना ज्यांचे यापुर्वी जैविक किटकनाशक उत्पादनाचे प्रशिक्षण झाले असेल अशा कर्मचाऱ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

१४) जैविक प्रयोगशाळा प्रमुख यांनी शासनाने प्रदान केलेल्या शक्तीनुसार व विहीत वित्तीय पध्दतीचा अवलंब करुन उपलब्ध करुन दिलेले अनुदान खर्च करावे व लेखा विषयक बाबी पार पाडाव्यात.

- **गुणवत्ता नियंत्रण**

१५) गुणवत्ता नियंत्रणाच्या दृष्टीने पुरवठा होण्यापुर्वी प्रत्येक बॅचचा नमुना काढण्यात यावा व त्याची गुणनियंत्रणाच्या दृष्टीने तपासणी करण्यात येऊन त्याची रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात यावी. नमुना प्रमाणित घोषित झाल्यानंतरच सदर साठयाच्या पुरवठयाची कार्यवाही करावी.

१६) गुण नियंत्रणाच्या दृष्टीने संचालक (निवगुनि) यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे.

- **मासीक प्रगती अहवाल**

१७) जैविक किटकनाशकांच्या उत्पादनाबाबत व खर्चाबाबत मासिक प्रगती अहवाल व एमईएस दरमहा विहीत नमून्यात जिल्हयास, विभागास व कृषि आयुक्तालयास सादर करण्यात यावा.

संचालक
**विस्तार व प्रशिक्षण**
**कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे-५**

| अ. क्र. | प्रयोगशाळांचे नाव | कीटकनाशकाचे नाव | मागील सप्ताह अखेर एकूण शिल्लक उत्पादन (कि/ली) | सप्ताहात झालेले उत्पादन (कि/ली) | एकूण उत्पादन (४+५) | पुढील सप्ताहात होणारे उत्पादन (कि/ली) | जिल्हानिहायप्राप्त पुरवठा आदेश व प्रत्यक्ष झालेला पुरवठा | | | पुरवठयानंतर प्रत्यक्ष शिल्लक साठा (कि/ली) | शिल्लक साठयापैकी | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | जिल्हा | पुरवठा आदेश (कि/ली) | प्रत्यक्ष झालेला पुरवठा(कि/ली) | | प्रमाणित (कि/ली) | अप्रमाणित (कि/ली) | तपासणीस पाठविलेला साठा(कि/ली) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |

शासकीय जैविक किटकनाशक प्रयोगशाळा साप्ताहिक उत्पादन व पुरवठा अहवाल

दिनांक - /२०१ ते दिनांक - / /२०१

http://mahaagri.gov.in/